RNI No. MAHBIL/2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ३, अंक ३३] गुरुवार, मार्च ३०, २०१७/चैत्र ९, शके १९३९ [पृष्ठे ६, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक ७०

## प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

### वित्त विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २९ मार्च २०१७

### अधिसूचना

**महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२.**

क्रमांक मूवक.१५१७/प्र.क्र.२८/कराधान-१.—महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ (२००५ चा महा. ९) च्या कलम ९ च्या उप-कलम (१) द्वारे प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे उक्त अधिनियमास जोडलेल्या अनुसूची 'क', 'ग' ' आणि 'घ' मध्ये, दिनांक १ एप्रिल २०१७ पासून खालीलप्रमाणे सुधारणा करीत आहे, म्हणजेच :—

एक. अनुसूची क मध्ये,–

(१) नोंद ८ नंतर खालील नोंद दाखल करण्यात येत आहे, म्हणजेच :—

"८क व्यापारी व्यवहारासाठीचा कार्ड स्वाईप मशीन्स. शून्य %";

(२) नोंद ९क मधील, स्तंभ (२) मध्ये, "दिनांक ३१ मार्च २०१७" या शब्द आणि अंकाऐवजी "वस्तू आणि सेवा कर कायदा लागू होण्याच्या दिनांका लगतचा दिनांक" हे शब्द दाखल करण्यात येत आहेत ;

(३) नोंद २५ नंतर खालील नोंदी दाखल करण्यात येत आहेत, म्हणजेच :—

(क) "२५क मानवी पार्थिव शरीर दहनासाठी गॅस किंवा विद्युत दाहिनी. शून्य %";

(ख) २५ख बीआयएस निर्दिष्ट असलेले ५०० मायक्रॉन्स (microns) पेक्षा कमी जाडी नसलेले शेत तळ्यांसाठी वापरले जाणारे जिओमेंब्रेन (Geomembrane). शून्य %";

(४) नोंद ३३ नंतर खालील नोंद दाखल करण्यात येत आहे, म्हणजेच :— शून्य %";

"३३क दुधातील भेसळ तपासण्यासाठीचे मिल्क टेस्टिंग किट.

(५) नोंद ४४ नंतर खालील नोंद दाखल करण्यात येत आहे, म्हणजेच :— शून्य %";

"४४क मातीची पोषकता निर्धारित करण्यासाठीचे सॉईल टेस्टिंग किट.

(६) नोंद ५९ मधील, स्तंभ (२) मध्ये,

(एक) उप-नोंद (आठ) नंतर खालील उप-नोंद दाखल करण्यात येत आहे, म्हणजेच :— शून्य %";

"(नऊ) आमसुल

(दोन) " दिनांक ३१ मार्च २०१७ " या शब्द आणि अंकाऐवजी " वस्तू आणि सेवा कर लागू होण्याच्या दिनांका लगतचा दिनांक " हे शब्द दाखल करण्यात येत आहेत;

(७) नोंद ५९ मधील, स्तंभ (२) मध्ये, " दिनांक ३१ मार्च २०१७ " या शब्द आणि अंकाऐवजी " वस्तू आणि सेवा कर कायदा लागू होण्याच्या दिनांका लगतचा दिनांक " हे शब्द दाखल करण्यात येत आहेत.

**दोन.** अनुसूची ग मध्ये—नोंद १०८ मधील, उप-नोंद (एक) मध्ये, स्तंभ (२) मधील, खंड (ख), मध्ये दिनांक ३१ मार्च २०१७ " या शब्द आणि अंकाऐवजी " वस्तू आणि सेवा कर लागू होण्याच्या दिनांका लगतचा दिनांक " हे शब्द दाखल करण्यात येत आहेत.

**तीन.** अनुसूची घ मध्ये,—

(१) शीर्षकामध्ये " २० टक्के किंवा अधिक " या अंक आणि शब्दाऐवजी " ६० % पर्यंत " हे शब्द, अंक आणि चिन्हे दाखल करण्यात येत आहेत ;

(२) नोंद ६ मधील, स्तंभ (२) मध्ये, " नोंद क्रमांक ११ " या शब्द आणि अंकानंतर " नोंद क्रमांक ११ आणि नोंद क्रमांक ११क " हे शब्द, अंक आणि अक्षर दाखल करण्यात येत आहेत ;

(३) नोंद ११ मधील, स्तंभ (२) मध्ये, " भौगोलिक क्षेत्राव्यतिरिक्त " या शब्दानंतर " या अनुसूची मधील नोंद क्रमांक ११क मध्ये अंतर्भूत केले असेल त्या व्यतिरिक्त "; शब्द, अंक आणि अक्षर दाखल करण्यात येत आहेत ;

(४) नोंद ११ नंतर खालील नोंद दाखल करण्यात येत आहे, म्हणजेच :—

"११क राज्य शासनाने वेळोवेळी अधिसूचित केलेल्या शर्तींच्या अधीन राहून महाराष्ट्र राज्यात, दिनांक १ एप्रिल २०१७ पासून दिनांक ३१ मार्च २०२७ पर्यंतच्या कालावधीत, एअरपोर्ट ॲथोरीटी ऑफ इंडियाने निर्देशित केल्यानुसार, प्रादेशिक जोड योजनेअंतर्गत (Regional Connectivity Scheme) उड्डाणांसाठी, विक्री केलेले विमानचालन चक्की इंधन (शुल्क भरलेले). १ %".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**रा. द. भगत,**
शासनाचे उप सचिव.

## FINANCE DEPARTMENT

Hutatma Rajguru Chowk, Madam Cama Marg
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 29th March 2017

*NOTIFICATION*

MAHARASHTRA VALUE ADDED TAX ACT, 2002.

No. VAT-1517/C.R.28/Taxation-1.—In exercise of the powers conferred by sub-section *(1)* of section 9 of the Maharashtra Value Added Tax Act, 2002 (Mah. IX of 2005), the Government of Maharashtra hereby with effect from the 1st April 2017, amends the SCHEDULES 'A', 'C' and 'D' appended to the said Act, namely :—

In the Maharashtra Value Added Tax Act, 2002,—

(I) in SCHEDULE A,—

(1) after entry 8, the following entry shall be inserted, namely :—

" 8A Card swipe machines for merchant transactions. Nil%";

(2) in entry 9A, in column (2), for the figures, letters and word " 31st March 2017 " the words " the date immediately preceding the date on which the law relating to the Goods and Services Tax comes into force." shall be substituted ;

(3) after entry 25, the following entries shall be inserted, namely :—

*(a)* " 25A Gas or Electric fired human body incinerator. Nil%

*(b)* 25B Geomembrane used for farm pond, of thickness not less than 500 microns having BIS specification. Nil%";

(4) after entry 33, the following entry shall be inserted, namely :—
" 33A Milk testing kit for detecting milk adulteration. Nil%";

(5) after entry 44, the following entry shall inserted, namely :—
"44A Soil testing kit for determination of soil nutrients. Nil%";

(6) in entry 51, in column (2),—

*(i)* after the sub-entry (viii) the following sub-entry shall be added, namely :—
"(ix) Amsul Nil%";

*(ii)* for the figures, letters and word " 31st March 2017 " the words " the date immediately preceding the date on which the law relating to the Goods and Services Tax come into force." shall be substituted ;

(7) in entry 59, in column (2), for the figures, letters and word " 31st March 2017 " the words " the date immediately preceding the date on which the law relating to the Goods and Services Tax comes into force." shall be substituted.

(II) in SCHEDULE C, in entry 108, in sub-entry (1), in column (2), in clause (b), for the figures, letters and word " 31st March 2017 " the words " the date immediately preceding the date on which the law relating to the Goods and Services Tax comes into force." shall be substituted.

**(III)** in SCHEDULE D,

(1) in the heading, for the figures, sign and words " 20% or above " the words, figures and signs " upto 60% ", shall be substituted ;

(2) in entry 6, in column (2), for the words and figures " and entry 11 " the words, figures and letter, ", entry 11 and entry 11 A " shall be inserted ;

(3) in entry 11, in column (2), after the words " Raigad District " the words, figures and letter " other than that covered under entry 11A of this Schedule " shall be added ;

(4) after entry 11, the following entry shall be inserted, namely :—

| | | |
|---|---|---|
| "11A | Aviation Turbine fuel (Duty paid) sold within the State of Maharashtra during the period starting on 1st April 2017 and ending on 31st March 2027 for flights under Regional Connectivity Scheme as communicated by Airport Authority of India, subject to the conditions notified from time to time by the State Government, in the *Official Gazette*. | 1% ". |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

R. D. BHAGAT,
Deputy Secretary to Government.